ROSSARI
making you more competitive

July 31, 2023

| | |
|---|---|
| DCS-CRD<br>BSE Limited<br>First Floor, New Trade Wing<br>Rotunda Building, Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street, Fort, Mumbai 400001<br>Fax No.2272 3121/2037/2039<br><br>Stock Code: 543213 | Listing Compliance<br>National Stock Exchange of India Ltd.<br>Exchange Plaza, 5th Floor, Plot No. C/1,<br>'G' Block, Bandra- Kurla Complex<br>Bandra East, Mumbai 400 051<br>Fax No.2659 8237/8238<br><br>Stock Code: ROSSARI |

Dear Sir/Madam,

**Sub.: News Paper Publication of Extracts of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter ended June 30, 2023**

Pursuant to the Regulation 30 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we have enclosed herewith copies of Financial Express (English Daily) and Loksatta (Marathi Daily) both dated July 30, 2023 for publication of extracts of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter ended June 30, 2023.

The same may please be taken on record and suitably disseminated to all concerned.

Thanking you,

Yours Sincerely,
**For Rossari Biotech Limited**

PARUL GUPTA
Digitally signed by PARUL GUPTA
Date: 2023.07.31 12:36:15 +05'30'

ROSSARI BIOTECH LIMITED MUMBAI

Parul Gupta
**Company Secretary & Compliance Officer**
Membership No.: A38895

Encl.: as above

# उपचारातील गुंतागुंतीमुळे १५ पैकी एका मुलाचा मृत्यू

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** गरीब आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशातील (एलएमआयसी) कर्करोगग्रस्त १५ पैकी एका मुलाचा उपचारातील गुंतागुंतीमुळे मृत्यू होतो, असा दावा एका संशोधनात करण्यात आला आहे. हे संशोधन 'द लॅसेंट ऑनकॉलॉजी'मध्ये प्रकाशित झाले आहे.

एलएमआयसी देशातील कर्करोगग्रस्त मुलांचा मोठ्या संख्येने उपचारादरम्यान मृत्यू होतो. तर, विकसित देशात हेच प्रमाण अवघे तीन ते पाच टक्के आहे, असे या संशोधनात आढळले आहे. २१ वर्षांपर्यंतच्या कर्करोगग्रस्त मुलांवरील उपचारांसंबंधी ५०१ लेखांचा अभ्यास करण्यात आला आहे. यानुसार विकसित देशांत योग्य उपचार मिळत असल्याने कर्करोगग्रस्त मुलांच्या मृत्यूचे प्रमाण कमी आहे. परंतु एलएमआयसी देशात यामध्ये अद्यापही बदल झाला नाही.

कर्करोगग्रस्त मुलांच्या आरोग्याची ही जगभरातील स्थिती बिकट असून ती तात्काळ बदलण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचे आवाहन या संशोधनात करण्यात आले आहे.

संशोधकांनी सांगितले की, गरीब देशांतील १४.१९ टक्के कर्करोगग्रस्त मुलांचा उपचारादरम्यान मृत्यू होतो. हेच प्रमाण मध्यम उत्पन्न असलेल्या देशात ९.२१ तर, विकसित देशात ४.४७ टक्के आहे.







# ठाण्यात दिवसा अवजड वाहनांना बंदी

## खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनाचा निर्णय, दोन दिवसांत अधिसूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरील खड्ड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच खड्डे बुजविण्याच्या कामांमुळे ठाणे आयुक्तालय क्षेत्रात दिवसा होणारी अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याचा निर्णय ठाणे पोलिसांनी घेतला आहे. त्यासंदर्भाची अधिसूचना येत्या दोन दिवसांत काढण्यात येणार आहे. यानुसार रात्री ११ ते पहाटे ५ पर्यंत अवजड वाहनांना प्रवेश असेल. खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पुन्हा अवजड वाहनांना प्रवेश देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.



उरण, जेएनपीटी बंदरातून येणारी अवजड वाहने भिवंडी आणि गुजरातच्या दिशेने जाण्यासाठी घोडबंदर, शिळफाटा, मुंब्रा बाह्यवळण आणि मुंबई-नाशिक महामार्गावरून मोठ्याप्रमाणात जातात. गेल्या काही दिवसांपासून मुंबई - नाशिक महामार्गावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत अवजड वाहनांना परवानगी आहे. दुपारी अवजड वाहनांचा भार वाढल्यास मुंबई - नाशिक महामार्गावर कोंडीत भर पडते. याचे पडसाद विधानसभेतही उमटले होते. केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी शनिवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत महामार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्याबरोबरच अवजड वाहनांच्या वाहतुकीवर उपाययोजना राबविण्याबाबत सूचना सूचना केल्या. याच पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांकडून ठाणे आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी या शहरातील रस्त्यांवर दुपारी १२ ते ४ या वेळेत होणाऱ्या अवजड वाहनांना बंदी घालण्याचे नियोजन केले जाणार आहे.

माजिवडा ते वडपे मार्गावर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी काही वर्षांपूर्वी वाहतूक विभागाने जड-अवजड वाहनांची वाहतूक दिवसा बंद केली होती. याच धर्तीवर आताही वाहतूक बंद करावी, अशी सूचना कपिल पाटील यांनी यावेळी वाहतूक पोलिसांना केल्या.

### भिवंडीतील रोहित्र हटवण्याचे निर्देश...

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अडथळा येत असलेले भिवंडी तालुक्यातील दापोडे येथील रोहित्र व माणकोली नाक्याजवळील खांब हटविण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. गोदामांकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी संबंधितांबरोबर समन्वय साधावा, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्याबरोबर समन्वय ठेवून रस्ता दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावी, असे निर्देशही कपिल पाटील यांनी दिले.

# 'मेट्रो'साठी 'एमएमआरडीए'ला लवकरच १६० कोटी

## मुद्रांक शुल्कावरील अधिभाराची रक्कम देण्यास मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** राज्य सरकारकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) मेट्रो प्रकल्पासाठी लवकरच १६० कोटी रुपये मिळणार आहेत. मेट्रो प्रकल्पांना आर्थिक बळकटी मिळावी यासाठी मेट्रो मार्गालगतच्या परिसरातील काही निश्चित अंतरावरील मालमत्ता खरेदी - विक्रीवर एक टक्का मेट्रो उपकर (मुद्रांक शुल्क अधिभार) आकारण्यात येत आहे. या अधिभारापोटी जमा झालेल्या रकमेतील १६० कोटी रुपये मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी उपलब्ध होणार आहेत.

आंतरराष्ट्रीय दर्जाची वाहतूक व्यवस्था विकसित करण्यासाठी राज्यात मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानुसार मुंबई, मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीए, पुण्यात पीएमआरडीए, नवी मुंबईत सिडको, नागपुरात महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन, नागपूर यांच्या माध्यमातून मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांना राज्य सरकारने नागरी परिवहन प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. त्यांना आर्थिक बळ देण्यासाठी मुद्रांक शुल्कावर एक टक्का अधिभार आकारण्यात येत आहे. मेट्रो मार्गालगतच्या परिसरातील काही निश्चित अंतरावरील मालमत्ता खरेदी - विक्रीवर एक टक्का मेट्रो उपकर (मुद्रांक शुल्क अधिभार) आकारण्यात येतो. यातून जमा होणारी रक्कम मेट्रोच्या कामासाठी उपलब्ध करण्यात येते.

# 'मेट्रो ९'च्या उच्चदाब विद्युत वाहिनीजवळची कामे पूर्ण

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) 'दहिसर - मीरा - भाईंदर मेट्रो ९' मार्गिकेचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. यानुसार सिल्व्हर पार्क, भाईंदर येथे उच्चदाब विद्युत प्रवाह वाहिनीलगतच्या १.५ किमी लांबीच्या भागातील मेट्रो वायाडक्ट (उंच पूल) उभारणीसाठीच्या टीएल गर्डर्स, प्लॅटफॉर्म पिअर कॅप आणि कॉंकोर्स पिअर कॅपसारखी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

मेट्रो बांधकामस्थळी २२ ते २७ जुलै या कालावधीत रात्री १२ ते सकाळी ६ दरम्यान मुसळधार पावसात वीजपुरवठा नियंत्रित करून हे काम पूर्ण करण्यात आले.

एमएमआरडीएने मुंबई आणि मीरा-भाईंदर शहराला जोडणाऱ्या 'मेट्रो ९'चे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे. आठ स्थानकांचा समावेश असलेली ही मार्गिका १०.५८ किमी लांबीची आहे.

# अंधेरीतील गोखले पुलाच्या कामाला वेग

## गर्डरच्या सुट्या भागांची पहिली खेप दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अंधेरी पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या गोपाळकृष्ण गोखले रेल्वे उड्डाणपुलाचा पहिला टप्पा ऑक्टोबरमध्ये पूर्ण करण्याचे मुंबई महानगरपालिकेचे नियोजन आहे. त्यानुसार उड्डाणपुलाच्या किमान तीन मार्गिका सुरू करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेने महत्त्वाच्या कामाला सुरुवात केली असून पुलाच्या उजव्या बाजूच्या गर्डरचे ६२ टन वजनाचे सुटे भाग असलेली पहिली खेप प्रकल्पस्थळी दाखल झाली आहे. उर्वरित सुटे भाग ऑगस्टमध्ये दाखल होणार आहेत.

अंधेरीतील गोखले रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम महानगरपालिका करीत आहे. हा पूल लवकरात लवकर पूर्ण करून या परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या कामातील एक महत्त्वाचा टप्पा महानगरपालिकेने पार केला असून गर्डरचे ६२ टन वजनी सुटे भाग असलेली पहिली खेप शुक्रवारी रात्री प्रकल्पस्थळी दाखल झाली. पुलाच्या उजव्या बाजूच्या अर्थात उत्तर दिशेला (बोरिवली बाजूचे) उभारण्यात येणाऱ्या गर्डरच्या सुट्या भागांची ही पहिली खेप आहे.

या खेपेत प्राप्त झालेले सुटे भाग दोन ट्रेलरद्वारे वाहून आणण्यात आले. गर्डरचा तळ असलेल्या या सुट्या भागांचे वजन एकूण ६२ टन आहे. तर, उर्वरित भाग वाहून आणणारे ट्रेलर्स सध्या मुंबईच्या दिशेने प्रवास करीत आहेत. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात गर्डरचे सर्व सुटे भाग मुंबईत दाखल होतील. तर, दुसऱ्या म्हणजे डाव्या बाजूच्या (दक्षिणेकडील बाजूच्या) गर्डरची निर्मिती अंबाला येथे लवकरच सुरू होणार आहे.

# 'समृद्धी'स विलंब; महामार्ग पुढील वर्षी मेपर्यंत पूर्णत्वास

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावरील शेवटच्या इगतपुरी - आमणे (ठाणे) टप्प्याचे काम अत्यंत आव्हानात्मक आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हे काम मे २०२४ पर्यंत पूर्ण होईल असे जाहीर केले आहे. आतापर्यंत डिसेंबर २०२३ मध्ये शेवटचा टप्पा पूर्ण होईल असे सांगण्यात येत होते.

मुंबई - नागपूर समृद्धी महामार्ग एकूण ७०१ किमी लांबीचा असून नागपूर - भरवीरदरम्यानचा ६०० किमी लांबीचा टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. तर, तिसऱ्या टप्प्यातील भरवीर - इगतपुरी आणि चौथ्या टप्प्यातील इगतपुरी - आमणेदरम्यानच्या महामार्गाचे काम सध्या वेगात सुरू आहे.

भरवीर - इगतपुरी टप्प्याचे काम दिवाळीच्या आसपास पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर तात्काळ हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल केला जाईल, असे एमएसआरडीसच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यातील इगतपुरी - आमणेदरम्यानचा महामार्ग वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी डिसेंबर २०२३चा मुहूर्त जाहीर करण्यात आला होता.



### शेवटच्या टप्प्यात तब्बल १२ बोगदे...

मुंबई – नागपूर समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्यात तब्बल १२ बोगदे असून यातील एक बोगदा आठ किमी लांबीचा आहे. तर, उर्वरित ११ बोगदे सरासरी एक किमी लांबीचे आहेत. हे बोगदे कसारा घाटातून जाणार असून त्यामुळे कसाराघाट अगदी पाच–सहा मिनिटांत पार करता येणार आहे. त्याच वेळी या टप्प्यात १६ 'व्हायाडक्ट'चाही (उंच पूल, दरीवरून रेल्वे मार्गावरून जाणारा रस्ता) समावेश आहे. नाशिकमधील वशाळा येथील एका दरीवरून महामार्ग जाणार असून येथील पुलाचे खांब तब्बल ८४ मीटर म्हणजेच २७५ फूट उंच आहेत. हे काम सर्वाधिक आव्हानात्मक आहे. पावसाळ्यात या भागात काम करणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे सध्या तेथील काम बंद आहे. पावसाळ्यानंतरच या टप्प्यातील काम वेग घेईल.

# टिटवाळा-खडवलीदरम्यान मालगाडीत बिघाड

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**कल्याण :** मध्य रेल्वेच्या टिटवाळा-खडवली रेल्वे स्थानकांच्या दरम्यान शनिवारी सकाळी एका मालगाडीच्या डब्यांचा जोड (कपलिंग) तुटले. त्यामुळे दोन्ही बाजूचे डबे एकमेकांपासून साठ फूट दूर झाले. ही घटना लोकोपायलट-गार्डच्या लक्षात येताच मालगाडी तातडीने थांबविण्यात आली. अर्धा तासात दुरुस्ती करून मालगाडी मार्गस्थ झाली.

मुंबईकडून निघालेली मालगाडी नाशिक दिशेने जात असताना टिटवाळा-खडवली रेल्वे स्थानकांदरम्यान तिच्या मध्यभागी असलेल्या दोन डब्यांमधील जोड तुटले. हा बिघाड तातडीने दुरुस्त करण्यात आल्याने वाहतुकीवर फारसा परिणाम झाला नाही, अशी माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्याने दिली.

# जकात नाक्यांच्या जागांवर वाहतूक, व्यावसायिक केंद्र

## मानखुर्द आणि दहिसर प्रकल्पांसाठी हॉटेल व्यावसायिकांकडून सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईच्या वेशीवर असलेल्या दहिसर आणि मानखुर्द येथील जकात नाक्याच्या विस्तीर्ण जागेवर वाहतूक आणि व्यावसायिक केंद्र (हब) उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी मुंबईबाहेरून येणाऱ्या वाहतूक व्यावसायिक कंपन्यांच्या गाड्या येथे थांबविण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी पालिका प्रशासनाने पंचतारांकित हॉटेल व्यावसायिक, कन्व्हेंशन सेन्टर चालकांकडून सूचना मागविल्या आहेत.

जुलै २०१७ मध्ये वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यापासून ओस पडलेल्या जकात नाक्यांच्या जागेवर वाहतूक हब उभारण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार शीव - पनवेल महामार्गावरील मानखुर्द जकातनाका आणि पश्चिम द्रुतगती मार्गावरील दहिसर जकात नाक्यावर हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

महानगरपालिकेने या प्रकल्पासाठी सल्लागार नेमले होते व प्रकल्पाची चाचपणी सुरू केली होती. मुंबई बाहेरून येणाऱ्या वाहतूक व्यवसायिक कंपन्यांच्या गाड्या या ठिकाणीच थांबवण्याचा विचार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी दिली.

### फायदा काय?

या ठिकाणी ट्रक टर्मिनलही उभारण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. सध्या ओस पडलेल्या या जागेच्या वापरातून महानगरपालिकेला भाडे स्वरूपात महसूल मिळू शकेल. तसेच रोजगार निर्मितीही होईल, असे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी सांगितले.

### नगरसेवकांच्या सूचना...

मुंबईच्या सीमेवर असलेले पाचही जकात नाके गेल्या चार वर्षांपासून ओस पडले आहेत. या जकात नाक्यांच्या जागेवर अनधिकृत बांधकामांचे अतिक्रमण होऊ नये म्हणून नगरसेवकांनी विविध सूचना केल्या होत्या. काही वर्षांपूर्वी महानगरपालिकेने या जागेच्या वापरासाठी सल्लागारांकडून प्रस्तावही मागवले होते.

| ठिकाण | क्षेत्रफळ | प्रकल्प किंमत |
|---|---|---|
| दहिसर जकात नाका | १८,८६९ चौरस मीटर | ९९२ कोटी |
| मानखुर्द जकात नाका | २९,७७४ चौरस मीटर | २४० कोटी |

**ROSSARI BIOTECH LIMITED**
(AN ISO9001:2005 & 14001:2015 Certified Company)
CIN : L24100MH2009PLC194818
Regd. Office : 201 A & B, 2nd Floor, Akruti Corporate Park, L.B.S. Marg, Next to GE Gardens, Kanjurmarg (W) Mumbai – 400 078
T: +91-22-6123 3800 F: + 91-22- 25796982 E : info@rossari.com W : www.rossari.com

**EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2023**

Rs. in Million

| Particulars | Quarter ended 30th June, 2023 (Unaudited) | Financial Year ended 31st March, 2023 (Audited) | Quarter ended 30th June, 2022 (Unaudited) |
|---|---|---|---|
| Total income from operations | 4,106.06 | 16,558.81 | 4,347.10 |
| Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items) | 394.57 | 1,442.19 | 386.95 |
| Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 394.57 | 1,442.19 | 386.95 |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 292.19 | 1,072.57 | 286.80 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 293.04 | 1,075.57 | 286.64 |
| Equity Share Capital | 110.31 | 110.31 | 110.11 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year. | | 9,041.35 | |
| **Earnings Per Share (of Rs. 2/- each) (for continuing and discontinued operations) -** | | | |
| Basic (*Not annualized) | 5.30* | 19.46 | 5.21* |
| Diluted (*Not annualized) | 5.28* | 19.38 | 5.18* |

Additional Information on Standalone Financial Results is as follows

Rs. in Million

| Particulars | Quarter ended 30th June, 2023 (Unaudited) | Financial Year ended 31st March, 2023 (Audited) | Quarter ended 30th June, 2022 (Unaudited) |
|---|---|---|---|
| (a) Total income from operations | 2,583.42 | 9,751.72 | 2,337.36 |
| (b) Profit Before Tax | 290.88 | 956.45 | 208.76 |
| (c) Profit After Tax | 215.57 | 713.90 | 153.67 |

Notes:
1. The Consolidated financial results have been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 29th July, 2023. A review of the above interim financial results has been carried out by the statutory auditors.
2. The above is an extract of detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the websites of the Stock Exchange where shares of the Company are listed i.e. www.bseindia.com and www.nseindia.com and also on the website of the Company i.e. www.rossari.com.

Place : MUMBAI
Date : 29th JULY, 2023

For ROSSARI BIOTECH LIMITED
Sd/-
EDWARD MENEZES
Executive Chairman
DIN:00149205

